# Induction program

**Date:** 1 September, 2023

**Venue:-** Recreation Hall

**Organizers:-** IQAC

## Objective of the Event:

01. To introduce newly admitted students about various facilities in the college.
02. To make them aware various departments and their benefits.

## Brief Report:

Induction program is organized in the college for newly admitted students of semester-I at Under Graduate Level. The Induction Program is organized on 1st September, 2023 in the Recreation Hall. All the heads of the departments gave all relevant information about their department and their benefits to the students. Dr. M J. Meshram presided over the program and in his speech motivates the students to take active participate in all the activities and appealed them to show hidden potential.

## Event Outcomes:

All the students of Semester-I tried to understand the benefits of various activities and departments. Some students asked their queries and get cleared by the concerned head of the departments.






**देशोन्नती**

रविवार, दि. ३ सप्टेंबर २०२३

# शिवाजी महाविद्यालयात उद्बोधन कार्यशाळा



**गडचिरोली** शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची वैशिष्ट्ये सांगितली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग नोंदवून आपला बौद्धिक व शारीरिक विकास साधावा व आपला अमूल्य वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञानसंपन्न व्हावे असे आवाहन केले.

प्रा. संजय राऊत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागातील विविध विभागांची माहिती दिली व ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवांची ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून स्वतःचा बौद्धिक विकास कसा साधता येईल यावर मार्गदर्शन केले.

डॉ. गोरे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात खेळण्यात येणाऱ्या खेळांची माहिती दिली व क्रीडा क्षेत्राच्या माध्यमातून आपला शारीरिक विकास कसा साधावा व खेळाच्या माध्यमातून आपलं भविष्य कसे उज्वल करता येईल यावर मार्गदर्शन केले तसेच प्रा. संजय राऊत यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाबद्दल मार्गदर्शन केले व राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली आणि विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले.

डॉ. करोडकर यांनी विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची माहिती दिली तसेच प्रा. रुपेश कोल्हे यांनी विद्यार्थ्यांना समान संधी केंद्राची व स्कॉलरशिपची माहिती दिली.

डॉ. कैलास भांडारकर यांनी विद्यार्थ्यांना महिला तक्रार तक्रार निवारण व विद्यार्थी तक्रार निवारण या विभागाची माहिती दिली . आपण महाविद्यालयात कुठलाही अनुचित प्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी व विद्यार्थिनींना शारीरिक मानहाणी होणार नाही यावर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना करिअर कट्टा विषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात शिष्यवृत्तीबद्दल लोमेश दरडे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती स्वाधार योजना व फ्री शिप यावर मार्गदर्शन केले.

अजय मशाखेत्री यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा विभाग विषयी माहिती दिली. परीक्षा फॉर्म सुरु झाल्यानंतर त्याची मुदत व परीक्षा फॉर्म भरण्याची पद्धत यावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. संजय राऊत यांनी केले. संचालन डॉ. राजेंद्र गोरे यांनी केले तर आभार जे. जी. उईके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी ते करिता महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

यावेळी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**सकाळ**

मंगळवार, ५ सप्टेंबर २०२३

# शिवाजी महाविद्यालयात विशेष उद्‌बोधन कार्यशाळा

**गडचिरोली, ता. ४ :** स्थानिक शिवाजी महाविद्यालयात ग्रंथालय विभागाच्या वतीने विशेष उद्बोधन कार्यशाळेचे आयोजन नुकतेच करण्यात आले.

या कार्यशाळेचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाची सुरवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून करण्यात आली. प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची वैशिष्ट्ये सांगितली. विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग नोंदवून आपला बौद्धिक व शारीरिक विकास साधावा व आपला अमूल्य वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञानसंपन्न व्हावे, असे आवाहन केले.

प्रा. संजय राऊत दिली. ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवांची ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा उपयोग करून स्वतःचा बौद्धिक विकास कसा साधता येईल, यावर मार्गदर्शन केले. डॉ. आर. एस. गोरे यांनी विद्यार्थ्यांना विविध खेळांची माहिती दिली.

---

**लोकमत**

सोमवार, दि. ४ सप्टेंबर २०२३

# ग्रंथच देतील तुमच्या आयुष्याला कलाटणी

## प्राचार्य मेश्राम : शिवाजी कॉलेजात प्रबोधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन कार्यक्रमात सहभाग नोंदवून बौद्धिक व शारीरिक विकास साधावा व आपला अमूल्य वेळ वाया न घालवता ग्रंथालयाचा उपयोग करून ज्ञानसंपन्न व्हावे, असे आवाहन प्राचार्य डॉ. एम. जे. मेश्राम यांनी केले.

स्थानिक शिवाजी महाविद्यालयात १ सप्टेंबर रोजी ग्रंथालय विभागाच्या वतीने प्रबोधन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. प्रा. संजय राऊत यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालय विभागातील विविध विभागांची माहिती दिली. ग्रंथालय विभागाद्वारे विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सेवांची ग्रंथालय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांची माहिती दिली. विद्यार्थ्यांना ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून स्वतःचा बौद्धिक विकास कसा साधता येईल, यावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. आर. पी. करोडकर यांनी विद्यार्थ्यांना आजीवन अध्ययन व विस्तार विभागाची माहिती दिली.

डॉ. कैलास भांडारकर यांनी विद्यार्थ्यांना महिला तक्रार निवारण व विद्यार्थी तक्रार निवारण या विभागाची माहिती दिली. या कार्यक्रमात शिष्यवृत्तीबद्दल लोमेश दरडे यांनी विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती स्वाधार योजना व फ्री शिप यावर मार्गदर्शन केले. तसेच अजय म्हशाखेत्री यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा विभागाविषयी माहिती दिली. यावेळी विद्यार्थी उपस्थित होते.